# घटक ४ (अ) : आत्मकथन (चरित्र)
## चेलमा
**– प्रा. प्र. ई. सोनकांबळे**

अनुक्रमणिका


**४.० उद्दिष्टे**

**४.१ प्रास्ताविक**

**४.२ शब्दार्थ, वाक्प्रचार आणि टिपा**

**४.३ आत्मकथेचे अध्ययन**

४.३.१ थोरल्या बहिणीची माया
४.३.२ चेलम्यावरचा प्रसंग
४.३.३ बहिणीची माया अपारच

**४.४ नमुना उत्तरे**

**४.५ अधिक अध्ययन**

४.५.१ लेखकपरिचय
४.५.२ आत्मकथनाची शैली – काही विशेष
४.५.३ समीक्षकांची मते

**४.६ सारांश**

**४.७ सरावासाठी स्वाध्याय**

**४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके**

## ४.० उद्दिष्टे

'आत्मचरित्र' या साहित्यप्रकाराचा परिचय व्हावा, आत्मकथनाचे स्वरूप तुम्हाला समजून घेता यावे, या दृष्टीने येथे आत्मचरित्रातील एका उताऱ्याचे तुम्हांस अध्ययन करावयाचे आहे.
अध्ययनानंतर तुम्हांस–

१. आत्मकथन करणाऱ्या व्यक्तीचे, म्हणजेच लेखकाचे स्वभावविशेष समजून येतील
२. लेखकाच्या लेखनशैलीची वैशिष्टचे ध्यानी येतील,
३. 'चेलमा'वरील प्रसंगाचा सामाजिक अर्थ तुम्हांस नीट समजेल.
४. आत्मकथन हा किती प्रभावी कथनप्रकार आहे याची कल्पना येईल
५. लेखकाच्या भाषेचे, एकूणच बोलीभाषेचे सामर्थ्य किती असते, याची जाणीव होईल.

## ४.१ प्रास्ताविक

आपल्या आयुष्यातील गतगोष्टी सांगताना आपणांस एक प्रकारचा आनंद वाटत असतो. मग त्या गोष्टी दुःखाच्या का असेनात! स्वतःच्या जीवनातला अनुभव लेखक कसा व्यक्त करतो, त्याचे आपणांस आता अध्ययन करायचे आहे. प्रा. प्र. ई. सोनकांबळे आपल्या बालपणातला एक प्रसंग येथे सांगत आहेत. हा अनुभव दलित जीवनातला आहे.

'दलित' ही संज्ञा वर्णनात्मक किंवा वैशिष्टचदर्शक आहे. पूर्वी शेतकरी-कामकरी यांना, मजुरांना 'दलित' म्हणत असत. श्रीमंतांनी शोषण केलेले, पायदळी तुडविलेले या अर्थी हा शब्द योजला जात असे. म्हणजे 'अर्थ दलित' या अर्थी या शब्दाची उपयोजना केली जात असे. आता अलीकडे जन्मानेच, वर्णानेच जे दलित, म्हणजे तुडविले गेले आहेत, जात आहेत, त्यांना 'दलित' म्हटले जाते. येथील उताऱ्यात सोनकांबळे या एका दलित व्यक्तीचा अनुभव सांगितला गेला असला, तरी तो सर्व दलित-समाजाचाच आहे. व्यक्तिगत अनुभव सर्वस्पर्शी होतो. तेव्हा त्याला साहित्यपदवी प्राप्त होते.

## ४.२ शब्दार्थ, वाक्प्रचार, आणि टीपा

**परदिसा** – परदेशी, आईबाप गेलेला
**गनिमत** – देवाची कृपा, नशीब
**परभारी** – मागे (आईबापाच्या परभारी = आईवडिलांच्या मागे, त्यांच्या मृत्यूनंतर)
**भीव** – भीती, भय
**शिवभाऊ** – शीव म्हणजे गावाची हद्द. ज्यांच्या गावाच्या शिवा एकमेकींना भिडलेल्या आहेत त्या गावांतले लोक म्हणजे जणू 'शिवभाऊ'च!
**आंदरून** – आतून (आंदरून खूप माया = आतून, पोटात खूप माया)
**लई** – फार
**वर्दी** – माहिती
**लवून चोपून राहणे** – नम्रतेने, आदबीने राहणे
**भीतीच्या पोटी दडणे** – भीतीमुळे लपून राहणे
**बला येणे** – आळ येणे, संकट येणे
**पुसतागत नसणे** – पुसता सोय नाही, असे होणे. (पुसणे = विचारणे)
**उतीम लोक** – उत्तम, वरच्या वर्णाचे लोक
**जनावरे वळविणे** – गुरे राखणे
**पिके पोटरा धरून निसवायला लागणे** – कणसे दाण्यांनी भरून येणे म्हणजे पोटरा धरणे. दाणे बाहेर पडू पाहत होती, म्हणजे निसवायला आली होती.
**म्होरं जाणं** – पुढे जाणे
**भावकी** – भाऊबंद
**मऱ्याई** – मरी आई, रोग निवारण करणारी देवता
**मरुमाय** – मरी आई
**दाजी** – बहिणीचा नवरा

**दिवाळी भावईचे दिवस** – 'भावैचा सण' म्हणजे ज्येष्ठी अमावास्येला सुरू होऊन दिवाळीपर्यंत साजरा होणारा एक सण

**चोराच्या मनात चांदणं** – चोऱ्या अंधारात होतात. त्यामुळे चोराला चांदण्याची भीती वाटते. चांदणे वास्तविक त्याला काहीच करीत नसते. पण त्यालाच त्याची भीती वाटत असते. वाईट कर्म करणाऱ्याला त्याचे मन खात असते, असा या म्हणीचा अर्थ रूढ झाला आहे.

## ४.३ आत्मकथेचे अध्ययन

आता तुम्हांला या आत्मकथनात्मक उताऱ्याचे सूक्ष्म अध्ययन करायचे आहे. त्यासाठी या उताऱ्याचे तीन भाग केलेले आहेत. प्रत्येक भागाखाली प्रश्न दिले आहेत. त्यांची उत्तरे तुम्हांस देता येतील. अध्ययन संपल्यावर तुम्ही आपली उत्तरे सुचविलेल्या नमुना–उत्तरांशी पडताळून पाहा.

**आता १ ते २३ ओळीपर्यंतचा भाग वाचा –**

एकदा काय झालं तर मी चालतो एका बहिणीकडून दुसरीकडे म्हणजे एकीच्या गावावरून दुसरीकडे. दोन्ही बहिणी सख्ख्या मावस जावा. त्यांचे गावही जवळच. अगदी शिवंशेजारीच म्हणजे शिवभाऊच म्हणाना. खरं म्हणजे तिथं इतके गावं जवळजवळ आहेत की पुसतागत नाही. कारण एका शिवंवर जावं तर तिथं साऱ्याच आजूबाजूच्या गांवची शिव सुरू होते. म्हणजे पाचसहा गावची माणसे शेताच्या किंवा मजूर कामाच्या निमित्ताने रोजच भेटतात म्हटले तरी वावगं नाही.

मी लहानपणापासूनच म्हणजे मायबापाच्या परभारी मोठ्या बहिणीकडे राहात असे. बिचारीची परिस्थिती अगदीच हलाकीचीच, तरी तिचा माझ्यावर लई जीव. कारण मी जरा वेळ दिसंना गेलो की मटं तिला हुरहूर वाटायचं. अधूनमधून खूप शिव्या हसडायची. पण लगेच मयेने जवळ करायची. तिच्याकडून मी लहान बहिणीच्याकडे जात होतो. तर झालं काय दिवाळी भावईचे दिवस होते. तिकडच्या जमिनी जरा माळरानाच्या असल्यामुळे लवकरच पिकं पोटरा धरून निसवायला लागतात. तसाच मोसम होता. वाटेतच मला तहान लागली व तेथे मोठाली पिकं असल्यामुळे एकटे जायला जरा भीतीच वाटत होती. रस्त्यावर होता एक थोडा फार गोल खोदलेला व बाहेरून दगडाचा गोल कट्टा करून घेतलेला खड्डा. त्यात उन्हाळ्यात जरी नसेल तरी पावसाळ्यात रानसुट्या लागेपर्यंत तरी पाणी असतंय. त्या खड्ड्याला आमच्याकडे चेलमा म्हणतात. मला वाटले आता वाटेतच चेलमा है व पाणी बी काळंभोर दिसतंय व उतीम लोक कोणीबी दिसत नाही तर पिऊन घ्यावं पाणी व चालतं व्हावं. पुढे बऱ्याच अंतरावर पाणी होतं. पण तितक्या लांब जाण्यापेक्षा इथंच प्यावं पाणी असं वाटू लागलं. कारण त्या चेलम्यात हमेशा कुणब्याचे माणसं तर पाणी पीत नाहीत. पण त्यांचे ढोरंगुरं मातर जरूर पितात हे मी त्या रस्त्यानं जातासताना व काही दिवस भावाच्याऐवजी जनावरं वळताना पाहिलं होतं. अर्थात मी ढोरं वळण्यासाठी नोकर नव्हतो असे मुळीच नाही. परंतु मी ती ढोरं वळण्याची चाकरी जलदीच सोडून देऊन शाळकरी मुलगा झालतो.

एकीकडे मन म्हणायचे की अरे पाणी पिऊन घे व चालता हो. कोण काय करणार वाटायचं मुशाफराला. पण दुसरीकडे असे वाटायचे की जर कोणी कुणब्या-फिणब्यांनी फायलं तर उगीच बला येईल कारण खेड्यात लोक लई जलदी वळक्तात कोण कोणत्या जातीचा है म्हणून.

●●●

### ४.३.१ थोरल्या बहिणीची माया

प्रल्हाद आपले अनुभव सांगत आहे. त्याने आपल्या थोरल्या बहिणीच्या मायेसंबंधी लिहिले आहे. पुढील वाक्ये नीट समजून वाचा–

१. तिची बिचारीची परिस्थिती अगदीच हलाकीची होती.
२. तरी तिचा माझ्यावर लई जीव
३. मी जरा वेळ दिसंना गेलो की मटं तिला हुरहूर वाटायचं
४. मधूनमधून खूप शिव्या हसडायची
५. पण लगेच मयेनं जवळ करायची

प्रल्हादला वाटेत तहान लागली. चेलम्याचे पाणी प्यावे असे त्यास वाटले ते का ते लेखकाने कसे सांगितले आहे ते खाली दिलेल्या वाक्यांवरून तुम्हांस पाहता येईल–

१. वाटेतच चेलमा है
२. पाणी बी काळंभोर दिसतंय

३. उतीम लोक कोणीबी दिसत नाही
४. पुढं बऱ्याच अंतरावर पाणी होतं पण तितक्या लांब जाण्यापेक्षा इथंच पाणी प्यावं
५. चेलम्यात हमेशा कुणब्याचे माणसं तर पाणी पीत नाहीत
६. त्यांचे ढोरंगुरं मातर जरूर पितात
७. पिऊन घ्यावं पाणी आणि चालतं व्हावं

चेलम्याचे पाणी पिण्याचे तो ठरवतो, पण त्याचे मन तयार होत नाही. त्याच्या मनातली भय-भीत, चलबिचल कशी व्यक्त झाली आहे, ते पुढील वाक्यांवरून ध्यानी घ्या–

१. एकीकडे मन म्हणायचे की, 'अरे पाणी पिऊन घे व चालता हो.
२. कोण काय करणार वाटायचं मुशाफराला
३. दुसरीकडं असं वाटायचं की जर कोणी कुणब्या-फिणब्यांनी फायलं तर उगीच बला येईल
४. खेड्यात लोक लई जलदी वळक्तात कोण कोणत्या जातीचा है म्हणून

प्रल्हाद आपल्या बोलीभाषेत आपली कहाणी सांगत आहे. त्याची बोलीभाषेची रूपे समजून घेण्यासाठी पुढील शब्दरूपे पाहा–

(अ) १. जातासताना (ओळ १८) = जात असताना,
येथे दोन क्रियापदरूपांचा संधी झाला आहे.
२. मी चालतो (ओळ १) = मी चाललो होतो.
येथे 'चाललो' मधील 'ल' वर्णाचा लोप झाला व मग दोन क्रियापदरूपांचा संधी झाला आहे.
३. दिसंना गेलो (ओळ ७) = दिसलो नाही.
मूळ संयुक्त क्रियापदांतील घटकांची नकारार्थी-होकारार्थी रूपे उलट-सुलट केली आहेत.
४. मटं मोठं मूळ 'ओ'काराचा 'अ'कार झाला आहे.
मयेनं मायेनं मूळ 'आ'काराचा 'अ'कार झाला आहे.
५. उतीत उत्तम द्वित्त जाऊन दीर्घ 'ई'कार आला आहे.
६. फायलं पाहचलं
येथे पहिल्या वर्णात 'ह'कार मिसळला व दुसऱ्या अक्षरातील जोडाक्षर जाऊन सोपा उच्चार आला.

(आ) 'व' या उभयान्वयी अव्ययाचा उपयोग पाहा–
'... वाटेतच चेलमा है, व पाणी बी काळंभोर दिसंतय.
व उतीम लोक कोणीबी नाही, तर पिऊन घ्यावं पाणी
व चालतं व्हावं.'

जुन्या मराठी गद्यात, बखर-गद्यात 'व'चा असा दर गौणवाक्यारंभी उपयोग करीत असत. संस्कृतमध्ये 'च'चा असाच उपयोग करतात.

(इ) प्रल्हादच्या बोलीतले काही खास वेगळ्या धाटणीचे शब्दही पाहा–
(i) पुसतागत, परभारी, रानसुरी, उतीम लोक,
(ii) 'शिवभाऊ' हा शब्द तर स्वतः लेखकानेच निर्माण केला आहे. तो किती अर्थदर्शक आहे ते तुमच्या लक्षात आलेच असेल.
(iii) 'धुकूड पुकूड' या शब्दाचा अर्थ त्याच्या ध्वनीवरूनच समजतो. अशा शब्दास ध्वन्यनुसारी शब्द म्हणतात.

आता तुम्ही जेवढा भाग नीट वाचलात, त्याचे तुम्हांस आकलन झाले आहे की नाही, हे पाहण्यासाठी प्रश्न दिले आहेत. या प्रश्नांची नमुना उत्तरे पुढे दिली आहेत. आधी दर्शविलेल्या जागी स्वतंत्रपणे उत्तरे लिहा आणि मग नमुना उत्तरांशी पडताळून पाहा.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

(क) **जागा भरा**
१. तिची बिचारीची परिस्थिती ............ होती.
२. खेड्यात लोक ............... वळक्तात, कोण................ म्हणून.

(ख) **खालील वाक्ये पूर्ण करा**
१. एकीकडे मन म्हणायचे की ...........................................................................,
आणि दुसरीकडं असं वाटायचं की ...........................................................................

२. प्रल्हादवर त्याच्या वडील बहिणीचा इतका जीव होता की ....................................

(ग) पुढील ग्रामीण शब्दांची नागर रूपे लिहा –

| ग्रामीण | नागर |
|---|---|
| लई | |
| धुकूड पुकूड | |
| बला येणे | |
| उतीम लोक | |
| कुणबी-फिणबी | |
| कदी | |
| फायलं | |
| झालतो | |
| मातर | |

**आता एवढा भाग नीट वाचा –**

मी मन धुकूड पुकूड करीत असतानाही ओंजळीनं पाणी पिऊ लागलो तरच आजूबाजूनं झाडाझुडपांचा आवाज येऊ लागला. जसं म्हणतात ना चोराच्या मनात चांदणं पण मी थोडीच कुणाची चोरी करीत होतो. फक्त तहान लागली म्हणून पिढचानपिढचा रस्त्यावर असलेल्या रानातील चेलम्याचे पाणी पीत होतो.

तितक्यात आला एक झुपकेदार मिशावाला बारका माणूस. दिसायला मटा काटकुळा बारीक पण आवाज मटा भारी व त्यातच भर म्हणजे तो पाटलाच्या भावकीचा व जरा जंतर मंतर करणेवाला. त्याला लोक तसे मटे टरकतात. मला तसा अनभाव नव्हता पण त्याच्या नावाची वर्दी होती. तो चेलम्यावर बैल घेऊन आला तरी मी चालता होत होतो कारण छाती धडधड करीत होती. कारण एक तर महार पोरगा व दुसरं तर परदिसा म्हणून जरा लवून चोपून राहायची सवय झालती. तो माणूस आला जवळ चेलम्याच्या व म्हणाला 'अरं पोरा थांब जरा, चालास कुठे,' मी म्हणालो, 'मला गावाला जायचं' तर तो म्हणाला 'अरं थांबना' मी थोडं म्होरी गेलता; पण परत आलो तर तो माणूस म्हणाला, 'अरं गाडीच्या तुला कळत नाही का हा चेलमा हमचा उतीम लोकाचा है म्हणून'. मी गप्पच झालो कारण बोलावं तर एक तर जो जास्त बोलायला लागला. गनिमत त्यानं मला मारलं फिरलं नाही. कारण त्याला माहीत होतं की मी एक परदिसा पोरगा है व लईच मर्जीनं गावात रहाताव म्हणून. त्यानं म्हटलं हे बघ, आता खबरदार असं पाणी पियाचं नाही कदी आलाच तर हचा वाटेनं. नाही तर पाय देऊन चिरून टाकीन बेटचा. मी म्हणालो, 'नाहीजी बापू,आता करणार नाही. मी असं कधीच करीत नाही. परंतु लईच तहान लागली होती म्हणून पिलो. नसता पिलो नसतो.' त्याच्या रागीट टवकारणाऱ्या डोळ्यांकडे बघूनच मी घाबरलो. तो म्हणाला 'जारं आता. पण आता येशील कधी तर याद राख सजना.' मी नाही नाही म्हणून बहिणीच्या गावाकडे निघालो. अर्थात मला खूप वाईट वाटले की एका बहिणीचं घर मागे तर दुसरीचं म्होरी. तेही खूप लांबवर व हचा शिवंवर आडरानात. त्यानं जर मला मारलं असतं, तर कोण असतं तिथं मजा जीव वाचवायला. त्या माणसाने माझ्या देखतच पाच ओंजळी पाणी फेकून दिले व घागरीने पाणी काढून बैलाला पाजले. मी तसाच दचकत दचकत बहिणीचे गांव गाठले नि बेधडक बहिणीच्या घराकडे न जाता भीतीच्या पोटी बसलो.

• • •

## ४.३.२ चेलम्यावरचा प्रसंग

अखेर प्रल्हाद चेलम्याचे पाणी पिऊ लागतो. त्यावेळची त्याची मन:स्थिती, कोणी येत असल्याची चाहूल लागताच त्याने स्वत:च्या मनाची घातलेली समजूत कशी व्यक्त झाली आहे, ते पाहा–

१. मी धुकूड पुकूड करीत असतानाही ओंजळीने पाणी पिऊ लागलो
२. आजूबाजूनं झाडाझुडपांचा आवाज होऊ लागला
३. जसं म्हणतात ना चोराच्या मनात चांदणं...
४. पण मी थोडीच कुणाची चोरी करीत होतो
५. पिढचान् पिढचा रस्त्यावर असलेल्या रानातील चेलम्याचे पाणी मी पीत होतो.

प्रल्हाद चेलम्यावर पाणी पिऊ लागला तोच तेथे एक माणूस आला. तो माणूस लेखकाने आपल्यापुढे मूर्तिमंत उभा केला आहे. पुढील वाक्ये पाहा–

१. झुपकेदार मिशावाला
२. दिसायला मटा काटकुळा बारीक
३. पण आवाज भारी मटा

त्याची भीती वाटावी असे दोन तपशीलही लेखकाने दिले आहेत. कोणते?

१. तो पाटलाच्या भावकीचा
२. जंतरमंतर करणेवाला

तो माणूस लेखकाने देहाने आणि मनाने तुम्हांपुढे असा उभा केला आहे. त्याचा देह आणि त्याचा स्वभाव यातला भेद नीट ध्यानी घ्या.

पुढील घटना लेखकाने संवादरूपाने चित्रित केली आहे. हा संवाद पुन्हा वाचा. वाचल्यावर तुमच्या लक्षात ये प्रल्हाद आणि तो पाटलाचा माणूस यांच्या स्वभावविशेषांवर खूपच प्रकाश पडतो. माणसाचा ताठा, आपल्या 'उत्तीम'पणाचा अभिमान, प्रल्हादला दिलेली जरब त्यातून कशी व्यक्त होते ते पाहा. त्याचबरोबर प्रल्हादचा गरीब स्वभाव, पडते-नमते घेण्याची वृत्ती आणि त्यामुळे त्याची झालेली सुटाक सुटका या नाटचमय संवादरूपात व्यक्त झालेली तुम्हांस दिसेल.

या संवादातील नाटच संघर्षामध्ये नसून गरीब स्वभावाने एका रगेलाला वश करण्याच्या कौशल्यात आहे. प्रल्हादचे गप्प बसणे; त्याचे आर्जवी बोलणे नीट अभ्यासा. पुढील वाक्य पाहा–

> "नाहीजी बापू, आता करणार नाही. मी असं कधीच करीत नाही. लईच तहान लागली होती म्हणून पिलो. नसता पिलो नसतो."

प्रल्हादाला प्रत्यक्ष मार बसला नाही. पण शारीरिक मार बसला नसला तरी मानसिक चटके चांगलेच बसले आहेत. प्रल्हाद चेलम्यापासून निघाला. निघता निघता त्याने पाहिले–

"त्या माणसाने माझ्या देखतच पाच ओंजळी पाणी फेकून दिले व घागरीने पाणी काढून बैलाला पाजले."

या कृतीचा अर्थ काय? प्रल्हाद महार होता. त्याचा हात पाण्याला जेथे लागला होता तेथे ते पाणी विटाळले होते. ते काढून टाकून, मग न विटाळलेले पाणी त्या माणसाने घागरीत भरले व ते बैलाला पाजले. प्रल्हादने स्पर्श केलेले पाणी बैलालाही चालत नव्हते. माणसापेक्षा जनावर मोठे! या एका लहानशा कृतीत अस्पृश्यतेवर – या वृत्तीवर केवढी दाहक विदारक टीका केली आहे ते नीट ध्यानी घ्या. पाटलाच्या माणसाचे कृत्य हास्यास्पद आहे आणि मनस्वी चीडही आणणारे आहे पण रूढीला तेच मान्य आहे. एका लहानशा तपशिलाने, प्रत्यक्ष कसलीही टीका न करता, लेखकाने 'अस्पृश्यता' या हिंदुसमाजाच्या हाडीमासी खिळलेल्या, सनातन, दुर्धर रोगावर 'क्ष'-किरण टाकलेला आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

(घ) पुढील शब्दांची नागर रूपे लिहा.

| **मूळ बोलीतील रूपे** | **नागर रूपे** |
|---|---|
| जंतरमंतर करणेवाला | |
| परदिसा | |
| म्होरं जाणे | |
| गाडीच्या | |
| मजा जीव | |

(ङ) पुढील शब्दांचे वैशिष्टच कोणते ते सांगा.

| **शब्द** | **वैशिष्टच** |
|---|---|
| दचकत दचकत | |
| छाती धडधड करीत होती | |
| टवकारणारे डोळे | |

(च) 'नसता पिलो नसतो' हे वाक्य प्रमाण मराठी भाषेत लिहा. दोन्हीपैकी कोणते अधिक परिणामकारक वाटते व का ते सांगा.

........................................................................................................................................

........................................................................................................................................

(छ) **जागा भरा**

१. तितक्यात आला एक .......... .......... ...... माणूस. दिसायला ........... पण आवाज............ त्यातच भर म्हणजे तो............... आणि जरा ............... करणेवाला!

२. मी .................. करीत असतानाही ................ पाणी पिऊ लागलो.

(ज) शेतावरल्या माणसाने प्रल्हादला सोडून दिले, कारण तो माणूस दयाळू व उदार मनाचा होता. म्हणून,

की

प्रल्हादाचा स्वभाव नमते घेण्याचा, सर्वांशी गोड बोलून मर्जी राखण्याचा होता म्हणून?
यांपैकी कोणते विधान बरोबर आहे?

........................................................................................................................................

........................................................................................................................................

(झ) पुढील वाक्ये कोणी म्हटली आहेत? कोणास?

१. 'अरं गाडीच्या, तुला कळत नाही का हा चेलमा हमचा उतीम लोकांचा है म्हणून!''

२. ''लईच तहान लागली म्हणून पिलो. नसता पिलो नसतो.''

| कोणी? | कोणास? |
|---|---|
| १. | |
| २. | |

**हा भाग नीट वाचा.**

समोरच्या मऱ्याईच्या देवळात. कारण एकदम जायला मन कधीच धजत नव्हते. कारण तिचा नवरा म्हणजे मजा दाजी मटा गमतीदार नि मटा डोळे वटारायचा म्हणून त्याच्या भीतीनं हमेशाच मऱ्याईच्या देवळात बसतासे. तसाच आताही बसलो. एकदम देवळात गेलो की, मऱ्याईचे देऊळ साफसूफ केल्याशिवाय मला करमायचे नाही. मी ते देऊळ साफसूफ करून बसलो.

तिथं खूप लहान-लहान पोरं पोरी खेळायच्या. घरी जाताना कोणी तरी बहिणीला सांगायचे की 'काकू काकू परलाद मामा आला.' काकू म्हणायचे कारण-- म्हणजे मजी बहिण तितल्या सर्व भावकीत लहान भावाची बायको. सगळचात लहान चुलता पडतासलेल्या माणसाच्या बायकोला लई करून काकू किंवा ताई म्हणतात. तसं गल्लीतले सारे लहान पोरं मज्या बहिणीला काकू म्हणायचे. जसा हमेशा घडायचा प्रकार तसाच घडला आताबी. तर झालं काय तर दोनचार पोरं मऱ्याईच्या देवळात खेळून झाल्यावर ज्याच्या त्याच्या घरी निघून गेले व वाटेतच बहिणीला सांगितले की, 'आये काकू, तुझा धाकटा भाऊ आलाय. आये खरंच आलाय परलादमामा. मरूमायाची शपत,' कदीकदी बहिणीला खरंच वाटायचं नाही. जरा बहिणीला येण्यास उशीर झाला की मी तिच्या वाटेकडेच हुरहूर नजर लावून टकमक बघत असे. एकदाची आली बाई व तिनं मला पायलं व मी फायलो. नेहमीप्रमाणे म्हणाली, 'अरं बापू का बसलास इथं. घरी 'चल मा' म्हणत मला नेहमीप्रमाने म्हणाली. तिला मला फायल्यावर आंदरून खूप मया वाटायची पण तिला तिच्या नवऱ्याचा व जरा करडचा नजरेनं बघणाऱ्या म्हाताऱ्या सासऱ्याचे भीव वाटायचं तर माझ्यासाठी..... तिचा जीव तुळतुळ तुटायचा. ती पुढेपुढे मी आंधळचासारखा ईकडे तिकडं बघत खाली मुंडी घालून तिच्या घरी गेलो. हमेशासारखा एका कोपऱ्यात दडून बसलो. दाजी घरी नसला तर थोडसं मन मोकळं वाटायचं व आलारं माय घरी की मजा जीव धुकूड पुकूड करायचा. कारण मला तर बोलेलंच पण बिचाऱ्या भोळचा गरीब बहिणीस बोलेल वाटायचं व मला वाईट वाटतंय म्हणून तो कधी मजी कदर न करता बहिणीला खूप बोलायचा. मज्या देखत बहिण बिचारी खूप डोळे पुसत रडायची व तसेच त्याने दाब दिल्यावर काम करायची. तसंच झालं आताबी. मला वाटले तहान लागल्यावर चेलम्यावर पाणी पिण्याला गेलो तर तसं व बहिणीने 'चल मा' म्हणून घरी आणल्यावर असं व राहून राहून वाटू लागलं की आपल्यात आणि तुपल्यात काही फरक नाही गडचा. असा घडला तो प्रकार त्या चेलम्याचे पाणी पिण्याचा व बहिणीच्या 'चल–मा' म्हणण्याचा.

• • •

## ४.३.३ बहिणीची माया अपारच

प्रल्हाद चेलम्याहून निघतो तो धाकटया बहिणीकडे जाण्यासाठी. पण तो थेट तिच्या घरी जात नाही. गावाबाहेर मरीआईच्या देवळात तो थांबतो, बसतो. दाजीबाची– बहिणीच्या नवऱ्याची भीती. दाजीबाचे वर्णन त्याने कसे केले आहे पाहा.

'मटा गमतीदार नि मटा डोळे वटारणारा'

बहीण स्वत: येऊन त्याला घरी घेऊन जाते. जात असतानाही प्रल्हाद दाजीबाच्या धाकानं घाबरलेला. ही त्याची भीती पुढील वाक्यात व्यक्त झाली आहे
''ती (बहीण) पुढेपुढे, मी आंधळयासारखा ईकडं तिकडं बघत खाली मुंडी घालून तिच्या घरी गेलो.'' दाजीची भीती किती वाटे? प्रल्हादचे पुढील उद्‌गार पाहा– ''दाजी घरी नसला तर थोडंसं मन मोकळं वाटायचं व आलारं माय घरी की मजा जीव धुकूड पुकूड करायचा.''

दाजी आपल्याला बोलतो यापेक्षा प्रल्हादला वाईट वाटायचे ते त्याच्यामुळे दाजी आपल्या बहिणीला बोलतो व ती 'खूप डोळे पुसत रडे' याचे. प्रल्हाद बहिणीच्या घरी कोठे बसे? प्रल्हाद सांगतो– ''हमेशासारखा एक कोपऱ्यात दडून बसलो!''

एकेका एकेका लहान लहान तपशिलाने प्रल्हादने आपल्या धाकटया बहिणीचा संसारच येथे उभा केला आहे. बहिणीची माया, तिची कुचंबणा, प्रल्हादला बहिणीबद्दल वाटणारे प्रेम आणि अपराधीपणाची जाणीव, हे येथे नीट समजून घेण्यासारखे आहे.

मरीआईच्या देवळात प्रल्हाद देऊळ साफसूफ करून बसे. प्रल्हादच्या स्वभावात आळस नाही; चांगले काम करण्याची त्याची सहजप्रवृत्ती होती. कुठेही आणि कोणाचेही चांगले काम तो स्वत:हून करी. देऊळ स्वच्छ ठेवावे, ही बालपणातही त्याला जाणवत होते.

मरीआईच्या देवळात पोरं-पोरी खेळायच्या. त्या सर्वांना प्रल्हाद माहीत होता. प्रल्हादला त्याच्या बहिणीच्या नवऱ्याचा धाक वाटे, हेही त्यांना माहीत असावे. त्याच स्वत:हून 'प्रल्हादमामा' आल्याचे त्याच्या बहिणीला सांगतात. बहीण येते. प्रल्हाद व त्याची बहीण यांच्यातील खऱ्याखुऱ्या मायेचे वर्णन लेखकाने कसे केले आहे पाहा.... ''जरा बहिणीला येण्यास उशीर झाला की मी तिच्या वाटेकडंच हुरहूर नजर लावून टकमक बघत असे. एकदाची आली बाई व तिनं मला फायलं.... नेहमीप्रमाणं म्हणाली, ''बरं बापू का बसलास इथं? घरी 'चल-मा?' मला फायल्यावर तिला आंदरून खूप माया वाटायची!''

आपल्या या हकिकतीचा शेवट लेखकाने कसा केला आहे ते पाहण्यासारखे आहे. 'चेलमा' आणि 'चल मा' हे दोन शब्द एकत्र आणून त्याने काय साधले आहे? चेलम्यावर काय घडले? 'चल मा' म्हणून मायेने बहिणीने घरी आणले, तेव्हा घरी काय घडले? दोन्ही ठिकाणी बोलणे खाणे, माराची भीती वाटणे हे आहेच! एकूण 'चेलमा' आणि मायेचे 'चल मा' हे बोलावणे दोन्ही सारखेच दु:खद! येथे लेखकाने शब्दावर श्लेष न करता, त्यातील ध्वनिसाम्य पकडून, जीवनावर मार्मिक सूचक भाष्य केले आहे.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न**

(ञ) **रिकाम्या जागा भरा**

१. मजा दाजी ............. नी .................

२. मी बहिणीच्या वाटेकडं .................. नजर लावून ........... बघत असे. मला फायल्यावर बहिणीला ............ खूप ............ वाटायची.

३. बहीण पुढं पुढं आणि मी ............ इकडं तिकडं बघत ............... तिच्या मागून घरी गेलो.

४. दाजी घरी नसला तर थोडंसं ............ वाटायचं, व आलारं की मजा जीव ............ करायचा.

(ट) **एका वाक्यात उत्तर द्या.**

१. देवळातल्या पोरांनी प्रल्हादमामा आल्याची खात्री त्याच्या बहिणीला कशी करून दिली?

२. प्रल्हाद बहिणीच्या घरी न जाता मरीआईच्या देवळात का थांबत-बसत असे?

३. प्रल्हादला जास्त वाईट वाटायचं ते आपला मेव्हणा आपल्याला बोलतो म्हणून की आपल्या बहिणीला बोलतो म्हणून?

**उत्तर**

१. ..........................................................................................

२. ..........................................................................................

३. ..........................................................................................

(ठ) 'चेल मा' आणि 'चल मा' या शब्दांतून लेखकाने कोणता जीवनार्थ सूचित केला आहे?

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

(ड) पुढील शब्दांना पर्यायी म्हणून ग्रामीण बोलीतील शब्द लिहा.

| **ग्रांथिक** | **ग्रामीण** |
|---|---|
| तीळतीळ तुटणे | |
| आतून खूप माया | |
| नेहमी | |
| आमचा | |
| पाण्याचे डबके | |
| पुष्कळदा | |
| नशीब | |
| परदेशी | |

(ढ) पुढील शब्दांची फोड करा.

| **शब्द** | **फोड** |
|---|---|
| पडतासलेला | |
| बसतासे | |
| जातासताना | |

## ४.५ नमुना उत्तरे

(क) अगदीच हलाकीची, जलदी, कोणत्या जातीचा, धुकूड पुकूड, ओंजळीने

(ख) १. कोण काय करणार मुशाफराला, कोणी कुणब्या-फिणब्यांनी फायलं तर उगीच बला येईल.
२. मी थोडाच कुणाची चोरी करीत आहे, रस्त्यावर असलेल्या रानातील चेलम्याचे तर पाणी पीत आहे!
३. तो जरा वेळ दिसला नाही की तिला मोठी हुरहूर वाटायची

(ग) पुष्कळ, धाकधूक, संकट येणे, उत्तम लोक कुणबी-बिणबी, कधी पाहचलं, झालो होतो, मात्र

(घ) झुपकेदार, मटा काटकुळा, मटा भारी, पाटलाच्या भावकीचा, जंतरमंतर.

(ङ) तो माणूस दुष्ट नव्हता; त्याला आपल्या उच्च वर्णाचा अभिमान होता इतकेच. प्रल्हादवर त्याच्या लाघवी स्वभावामुळे सर्वांचीच माया होती. दोन्ही विधाने बरोबर आहेत. ती परस्पर-विरोधी नसून पूरक आहेत.

(च) १. शेतातल्या माणसाने, प्रल्हादला
२. प्रल्हादने, शेतातल्या माणसास

(छ) जादू-टोणा करणारा, परदेशी, पढे जाणे, गाढवीच्या, माझा जीव.

(ज) हे शब्द उच्चारताच त्यांच्या ध्वनीवरून अर्थ ध्यानी येतो. (अशा शब्दांना ध्वन्यनसारी शब्द म्हणतात.)

(झ) 'नाही तर प्यालो नसतो.' ग्रामीण बोलीतले वाक्य उच्चाराला सोपे आणि अनुप्रासामळे प्रवाही वाटते. जड-बोजड वाटत नाही.

(ञ) १. मटा गमतीदार, डोळे वटारायचा.
२. हुरहूर, टकमक.
३. आंधळ्यासारखा, खाली मुंडा घालून
४. मोकळं, धुकुड पुकुड.

(ट) १. मरुमायच्या शपथेवर सांगून
२. प्रल्हादला आपल्या मेव्हण्याची भीती वाटायची.
३. मेव्हणा आपल्यामुळे आपल्या बहिणीला बोलतो म्हणून.

(ठ) रस्त्यावरचे डबके काय आणि मायेने ओथंबलेले बहिणीचे शब्द काय, अखेर दोन्हीही आपल्यास सारखेच दुःख देणारे, हा अनुभव प्रल्हादचा जीवनाचे सारसूत्र दाखविणारे

(ड) तुळतुळ तुटणे, आंदरून खूप मया, हमेशा, हमचा, चेलमा, लई करून, गनिमत, परदिसा.

(ढ) पडत असलेला, बसत असे, जात असताना.

## ४.५ अधिक अध्ययन

### ४.५.१ लेखकपरिचय

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर दलित समाजातून कवी, कथालेखक, आत्मचरित्रकार आणि अलिकडे नाटककार यांची पिढीच जन्माला आली. त्यांच्यातील अस्मितेचा अनावर उद्रेक त्यांच्या ह्या लेखनातून प्रकट झालेला आहे. आत्मचरित्रलेखन हा त्यातील एक जीवनदर्शनाच्या व साहित्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचा भाग होय.

प्रा. प्र. ई. सोनकांबळे हे औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला-वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य असून इंग्रजी विभागाचे प्रमुख आहेत.
मराठवाड्यातील सुल्लाळी या गावी त्यांचा जन्म झाला.

त्यांना पुढील मानसन्मान मिळाले आहेत.

(१) अध्यक्ष, तिसरे दलित साहित्य सम्मेलन, औरंगाबाद.

(२) स्वागताध्यक्ष, दलित नाट्य महोत्सव, औरंगाबाद, १९८२.

प्रा. प्र. ई. सोनकांबळे यांच्या 'आठवणीतील पक्षी' या आत्मकथनात्मक लेख संग्रहातील हा उतारा त्यांच्या बालपणातील एक अतिशय अंतर्मुख करणारा अनुभव सांगणारा आहे. त्यांच्या या पुस्तकाला 'महाराष्ट्र राज्य ग्रंथ पुरस्कार' मिळालेला आहे.

### ४.५.२ आत्मकथन शैली – काही विशेष

प्राचार्य सोनकांबळे जणू आपल्यासमोर बसून आपणांस आपली कहाणी सांगत आहेत, असे जाणवते.
"एकदा काय झालं–"
"तर झालं काय–
"जशा हमेशा घडायचा प्रकार, तसाच घडला आता बी" – ह्या नित्य बोलण्यातल्या लकबी आहेत. अशाच आणखी कितीतरी लकबी या निवेदनात येतात ते तुमच्या सहज ध्यानी येईल.

आपण बोलताना आपली वाक्ये अगदी काटेकोर दृष्टीने व्याकरणशुद्धच बोलतो, असे नाही. वाक्ये कधी तुटलेली असतात, नीट जोडलेली नसतात, पण त्यानेच एक लवचिकपणा जाणवतो. उदाहरणार्थ– "तो चेलम्यावर बैल घेऊन आला तरी मी चालता होत होतो. कारण छाती धडधड करीत होती."

कथनाला - कहानीला – बोलीभाषा फार उपयुक्त ठरते. बोलीभाषेचा साधेपणा, सरळपणा, थेटपणा याकामी उपयोगी पडतो. ती लवचिक आणि खुली असते. तिला एक प्रकारचा गोडवा असतो. उच्चारदृष्टचा सोपी आणि अर्थदृष्टचा नितळ अशी ती असते. बोलीला स्वत:ची गतिमानता असते. हे सर्व विशेष येथे तुम्हांस जाणवतील.

पुढील दोन प्रसंगांचे कथन कसे केले आहे ते जरा बारकाईने पाहा.

प्रसंग–१. प्रल्हाद वाटेवरच्या चेलम्याचे पाणी पितो. तेथे शेतातला माणूस त्याला दम भरतो.

प्रसंग–२. प्रल्हाद बहिणीच्या गावी येतो– देवळात थांबतो– पुढं बहीण त्याला घेऊन जाते.

यासाठी पुढील मुद्यांचा विचार करा–

१. शेतातल्या माणसाचे– देहामनाचे वर्णन
२. मेव्हण्याचे वर्णन
३. मरीआईच्या देवळातल्या मुलींचे वर्णन
४. दोन्ही प्रसंगातील वातावरणाची निर्मिती
५. बहिणीच्या भेटीचे वर्णन
६. लेखकाने आपल्या मनातील संवेदनांचे, भावनांचे केलेले वर्णन.

प्रस्तुत उतारा मोठ्याने वाचा. शब्दोच्चार, वाक्याची अंतर्गत लय, कथनाचे प्रवाहित्व, प्रसंगचित्रणातील नाटच, संवादातील हावभाव इत्यादी नीट ध्यानी घेऊन वाचा म्हणजे या कथनातील जीवनदर्शनाचा जिवंत प्रत्यय कसा येतो ते तुम्हांस जाणवेल. ही कथा नंतर तुम्ही सांगण्याचा प्रयत्न करा. काय फरक पडतो आणि परिणामदृष्टचा कोणते कथन प्रभावी जाणवते, ते पाहा.

### ४.५.३ समीक्षकांची मते

सोनकांबळे यांच्या या आत्मकथनाविषयी समीक्षकांची मते पाहा.

**प्रा. बाळकृष्ण कवठेकर**
'आठवणींचे पक्षी' हा प्र. ई. सोनकांबळे यांच्या आत्मचरित्रपर लेखांचा संग्रह दलित आत्मकथांच्या संदर्भात अद्वितीय ठरणारा आहे... पोरक्या, बहिणीच्या घरी आश्रयाला आलेल्या प्रल्हादाला दारिद्र्य, उपासमार, उपेक्षा, अपमान यांनी भरलेले जीवन जगावे लागते. या साऱ्यांनी करपून गेलेले, अकाली प्रौढ झालेले त्यांचे बालपण या आत्मकथेतून सतत प्रकट झालेले आहे. सोनकांबळे यांचे वैशिष्टच हे की, कमालीच्या शांतपणे, श्रेष्ठ कलावंतानाच साधणे शक्य असलेल्या अलिप्तपणे त्यांनी आपल्या गतजीवनाचे चित्र रेखाटले आहे. ना राग, ना द्वेष, ना आवेश, ना आक्रस्ताळेपणा, ना सुस्कारे, ना अश्रू ढाळणे. जे जसे झाले ते तसे, त्यावेळच्या मनोवस्थेसह त्यांनी साकार केले आहे. त्या प्रसंगांना कसलेही रंग देणे वा त्याच्यातून कसलाही अभिप्राय प्रकट करणे त्यांनी टाळले आहे. त्यामुळेच हे जीवन जणू समोरच जगले जात आहे, अशा स्वरूपात साकार झाले आहे.

सोनकांबळे यांनी आपल्या या आठवणी मराठवाड्यातील अस्सल महारी भाषेत लिहिल्या आहेत. तिनेही या आत्मकथेला एक सामर्थ्य प्राप्त करून दिले आहे. ही भाषा आत्मकथेचा विषय झालेल्या जीवनाचीच भाषा आहे. तिचे आणि त्या जीवनाचे गुणविशेष जणू अभिन्नच आहेत. म्हणून ती अत्यंत समर्थपणे दुःख, दैन्य, शोषण, कारुण्य इत्यादींचे दर्शन घडवते.... एका प्रचंड समाजाची भाषा एवढ्या समर्थपणे वाङ्मयीन आविष्काराचे माध्यम म्हणून प्रथमच उपयोजलेली आहे.

**प्रा. व. दि. कुलकर्णी**
'चेलमा'मधील अनुभव म्हणजे सामाजिक जीवनातील सनातन विषमतेचा वेध घेणारा आणि समाजपुरुषाच्या देहामनातील अतिखोलवर दडलेल्या अंतःस्थ रोगावर क्ष-किरण टाकणारा अनुभव आहे. अशा एकेका अनुभवाचे चित्रण अनेकानेक व्याख्याने आणि विद्वत्ताप्रचुर ग्रंथसंपादने यापेक्षा कितीतरी पटीने वाचकांच्या मनावर परिणाम करीत असते. ही एक नव्याने येणारी जागच असते, जिवंत प्रत्ययच असतो. दलित आत्मचरित्रे यासाठी महामोलाची ठरतात.

## ४.६ सारांश

प्रल्हाद (प्र. ई. सोनकांबळे) बालपणची एक आठवण सांगत आहे. आई-वडील गेले असल्याने हा मुलगा कधी थोरल्या बहिणीकडे, तर कधी धाकट्या बहिणीकडे राहतो. थोरली बहीण प्रेमळ पण तिची गरिबी फार. धाकटी बहीणही प्रेमळ पण तिचा नवरा आणि सासरा यांचे वागणे-बोलणे भयप्रद. प्रल्हाद

थोरल्या बहिणीकडून धाकटचा बहिणीकडे जात असताना वाटेत तहानेने व्याकुळ झाला. जनावरासाठी असलेल्या वाटेवरच्या चेलम्यातले पाणी पीत असता शेतातला माणूस त्याला दम भरतो व हाकलून देतो.. कारण महाराच्या पोरामुळे गुरांसाठी असलेले पाणी विटाळले गेले ना? धाकटचा बहिणीकडेही तो तडक जात नाही. गावाबाहेरच्या मरीआईच्या देवळातच देऊळ साफ करीत बसतो. मुले ही बातमी बहिणीला देतात व ती त्याला घेऊन जाते. त्याच्यामुळे बहिणीला नवऱ्याचे बोलणे खावे लागते. प्रल्हादला त्याचे फार वाईट वाटते.

आई-वडील नसलेल्या एका परदेशी दलित मुलाची ही कहाणी. प्रल्हाद जसे घडले तसे सांगतो. कोणावर त्याचा राग नाही, चीड नाही, टीका नाही. तो सरळ मनाचा, गरिबीने वागणारा, सर्वांची मर्जी सांभाळणारा, स्वभावाने लाजरा-बुजरा पण प्रत्येक गोष्टीची पक्की समज असणारा असा मुलगा आहे. त्याची ही कहाणी सर्व दलित समाजाची कहाणी बनते ती यामुळेच!

## ४.७ सरावासाठी स्वाध्याय

१. प्रल्हाद चेलम्याचे पाणी पितो, यात कोणाचे काय बिघडले?
२. प्रल्हादच्या धाकटचा बहिणीच्या घरचे वातावरण कसे होते? बहिणीच्या दु:खाचे स्वरूप आणि प्रल्हादच्या दु:खाचे स्वरूप सारखेच आहे का? त्यात कमी-अधिक असे काही सांगता येईल का?
३. गतायुष्यातल्या आपल्या दु:खाकडे लेखक आज कोणत्या वृत्तीने आणि दृष्टीने पाहत आहे? लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचे कोणते विशेष येथे दिसून येतात?
४. तुम्ही अनुभवलेल्या अशाच एखाद्या सामाजिक विषमतेच्या वागणुकीचे प्रसंगचित्र रेखाटा.

## ४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. **आठवणींचे पक्षी** – प्र. ई. सोनकांबळे
२. **बलुतं** – दया पवार
३. **मुक्काम-पोष्ट : देवाचे गोठणे** – माधव कोंडविलकर